महाराष्ट्र शासन
गृहविभाग
पोलीस अधीक्षक, कार्यालय, लोहमार्ग, पुणे
सीआयडी ऑफीस कंपाउंड, शिवाजीनगर,संगम ब्रीज जवळ, पुणे -४११००५

दुरध्वनी क्रमांक - ०२० - २५५४१५३३
फॅक्सक्रमांक- ०२० -२५५४४६३१
ई मेल - sp.railways.pune@mahapolice.gov.in

दि:- 13/02/2026.

## शारीरिक चाचणीसाठी उमेदवारांना सर्वसाधारण सूचना :-

- सर्व उमेदवारांनी मैदानी चाचणीकरीता देण्यात आलेल्या दिनांकास पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कवायत मैदान चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे- ४११००८ येथे सकाळी ५.०० वा. उपस्थित रहावे.
- उमेदवारांनी शासनाने जारी केलेले आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदानकार्ड, पासपोर्ट, महाविद्यालयीन ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स् यापैकी कोण्तेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.
- भरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांना मोबईल तसेच इतर इलेक्ट्रानिक उपकरणे, प्रतिबंधीत वस्तु स्वत:जवळ बाळगणे पुर्णत:मनाई आहे. तसेच स्टीरॉईड ,अंमली पदार्थ , उत्तेजक द्रव्य पदार्थ अशा वस्तू मिळून आल्यास फौजदारी गुन्हा नोंदविण्यात येईल.
- आपलेसोबत मौल्यवान व अनावश्यक वस्तू आणू नये. आणल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.
- उमेदवारांनी मैदानी चाचणीवेळी तोतयेगिरी ( डमी उमेदवार ) किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्याविरुद्ध तात्काळ फौजदारी गुन्हा नोंदविण्यात येईल.
- भरतीसाठी उमेदवार आवश्यक कागदपत्रे (शिक्षणाची पात्रता, पात्र वय , रहीवासी प्रमाणपत्र जातीचा दाखला, समांतर आरक्षण प्रमाणपत्र, NCL प्रमाणपत्र इत्यादी ) झेरॉक्स प्रति सोबत ठेवतील.
- भरती प्रक्रियेदरम्यान कोणत्याही उमेदवारास शारीरिक इजा / नुकसान झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील. तसेच शारीरिक चाचणी व मैदानी चाचणी ही उमेदवाराने स्वत:चे जबाबदारीने पार पाडायची आहे.
- लोहमार्ग जिल्हा पुणे पोलीस शिपाई भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, नि:पक्षपातीपणे व पारदर्शक (Neutral, Impartial & Transparent) होणार असून दक्षता अधिकारी म्हणुन मा. पोलीस अधीक्षक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

- उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे / प्रमाणपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यास त्याच टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल.
- कृपया उमेदवार अगर त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट / दलाल, अधिकारी / कर्मचारी यांच्या भुलथापांना / अमिषाला बळी पडु नये. यामध्ये कुणाचा वशिला / ओळखीचा उपयोग होणार नाही. उमेदवारांची निवड ही पुर्णपणे गुणवत्तेच्या आधारे होईल.
- उमेदवारांनी दिनांक २९/१०/२०२५ रोजी दिलेल्या जाहिरीतीमधील सर्व सूचनांची नोंद घ्यावी व त्याचे काटेकोरपणे पालन करावे.
- पोलीस भरती दरम्यान काही अपरीहार्य कारणास्तव संबंधित परीक्षा / चाचण्या अगर इतर कोणत्याही बाबतीत बदल करावयाचे झाल्यास ते अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.
- भरतीदरम्यान धावण्यासाठी स्पाइक शुजचा वापर प्रतिबंधीत करण्यात आला आहे.
- उमेदवार यांची इतर पोलीस पदाबाबत संबंधीत दिनांकास चाचणी असल्यास त्यांनी या कार्यालयास सूचित करून दि १८/०२/२०२६ ते २१/०२/२०२६ दरम्यान भरतीकामे उपस्थित रहावे.भरतीला येताना सोबत संबंधीत चाचणीचे आवेदनपत्र आणि मैदानी चाचणी दिल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.
- मैदानी चाचणी प्रकृती अस्वस्थामुळे पर्यायी तारीख दि १८/०२/२०२६ ते २१/०२/२०२६ या कालावधी दरम्यानेच देण्यात येईल. त्याकामी वैदयकीय उपचारादरम्यानचे पत्र देण्यात यावे.
- सर्व उमेदवारांची १८/०२/२०२६ ते २१/०२/२०२६ या कालावधीतच मैदानी चाचणी प्रक्रिया पार पडेल
- भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवार त्यांना काही आजार/शारीरीक व्याधी असल्यास त्याबाबत संबंधित अधिकारी यांना अवगत करण्यात यावे.
- उमेदवारांस शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी दरम्यान पुर्व परवानगीशिवाय मैदान सोडून कोठेही जाता येणार नाही.

(अश्विनी सानप )भा.पो.से

पोलीस अधीक्षक लोहमार्ग,पुणे